**सरकारतर्फे साक्षीदार कमांक -०४**

**मी शपथेवर खरे सांगतो की,**

**माझे नाव :** श्रीपत नागोराव नेहारे
वय - ५८ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त,
राह.गजानन अपार्टमेंट, म्हाळगी नगर, नागपूर.

**सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील कु. आर. व्ही. चरडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

१) दि.१८.०३.२०१६रोजी मी पोलीस स्टेशन लकडगंज येथे सकाळी १०.०० ते रात्री २१.०० वाजेपर्यंत डे ऑफिसर म्हणून कार्यरत होतो. माझे सहायक ए.पी.आय. मोले यांनी वेश्या व्यवसायाबाबत लेखी रिपोर्ट दिला होता. माझ्या समक्ष सदर रिपोर्ट देण्यात आला. आता मला तो रिपोर्ट दाखविण्यात आला. तो नि.क्र.२३ वर आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या रिपोर्टच्या आधारे मी एफआयआर दाखल केला. आता मला तो एफआयआर दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र.२४ वर आहे. गुन्हा दाखल केल्यानंतर अटक कार्यवाही करण्यात आली. आता मला अटक फॉर्म दाखविण्यात आला. त्यावर माझी सही व आरोपीची निशाणी अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते. मी आरोपीस बघितल्यास ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. पुढील तपास पी.आय. श्री. माने साहेबांनी केला.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपीतर्फे ॲड. श्री. एन.एन. राउत.**

२) हे म्हणने खरे आहे की, माझ्यापेक्षा वरिष्ठ अधिका-याने सदरचा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटा

<u>नि.फौ.प्र.क.४३७३/२०१६</u>
<u>सरकार वि. अंजली</u>
<u>निशाणी कमांक -२९</u>

रिपोर्ट नोंदवून घेतला आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपींवर खोटे आरोप लावण्यात आलेले आहे. हे म्हणने खरे नाही की, वरिष्ठ अधिका-यांच्या दबावाखाली खोटा तपास केला आहे.

**उलट तपास संपला.**

**<u>फेरतपास-काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(टी.एम.देशमुख-नाईक)
१७ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.१३/०६/२०२३.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik